महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअँप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ९५ वा | दिनांक : ०९/०१/२०२५ | वार : गुरूवार


## बुद्धाचा धम्म संपूर्ण जगात मानवता पेरणारा आहे - प्रो. फ्राय लाड सोरावित अफिपन्यो.




**बँकॉक** दि. ७ जानेवारी २०२४ (प्रतिनिधी) तथागत भगवान गौतम बुद्ध संपूर्ण जगात शांती, अहिंसा या तत्त्वज्ञानाची भूमिका प्रस्थापित करणारे पहिले महामानव होते की, ज्यांनी प्रज्ञा, शिल करूणा, समता, स्वातंत्र्य व बंधुता ही सामाजिक मूल्ये जनमानसात पेरून विश्वात्मक क्रांती करणारे पहिले विज्ञानवादी महामानव असल्याचे प्रतिपादन आयुथया थायलंड येथील पालि भाषेचे प्रसिद्ध अभ्यासक महापुलाँग कॉर्न विद्यापीठातील प्रोफेसर डॉ. फ्रापलाड सोरावित अफिपन्यो यांनी बँकॉक येथील हॉटेल बँकॉक पॅलेस बँक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद, पटाया इंडियन असोसिएशन आणि सोनवणे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या फुले-शाहू आंबेडकरी साहित्य संमेलन बँकॉक थायलंड येथे केले. यावेळी विचार मंचावर संमेलनाध्यक्ष प्रसिद्ध विचारवंत व या पहिल्या फुले शाहू आंबेडकरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. ऋषीकेश कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. युवराज धबडगे, बापुसाहेब सोनवणे, स्वागताध्यक्ष सुरेश राठी, नवीन सिंग, डॉ. राहुल म्हस्के, प्राचार्य प्रशांतकुमार वनंजे, संजिवन सोनटक्के आदी मान्यवर उपस्थित होते. सुरूवातीला इकोटेल हॉटेल ते हॉटेल बँकॉक पॅलेस हॉटेल पर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. या ग्रंथदिंडीत संपूर्ण भारतवासी संयोजक आयोजक रसिक, श्रोते, थायलंडमधील “मराठी भाषिक समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. या संमेलनाच्या अध्यक्ष स्थानावरून भाष्य करताना संमेलनाध्यक्ष प्रोफेसर डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले की, भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे सर्वच समाज स्तरातील माणसांची वैचारिक, सामाजिक प्रगती झाली. माणसांच्या उद्धाराची भूमिका बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर सारख्या महापुरूषांनी मांडून दलित, बहुजन शुद्रातिशूद्र, भटके विमुक्त आदिवासी समूहाचे जीवन जगत सुकर करून आपल्या भारतातील प्रत्येक नागरिकावर अनंत उपकार केल्यामुळेच आपण सर्व थायलंड सारख्या देशामध्ये विमानाने प्रवास करून येऊ शकलो ही खरी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांची देण आहे, असे आपण मानले पाहिजे. कारण बाबासाहेबांच्या पूर्वी आपल्या भारतातील समाज समुहाची काय दिशा आणि दशा होती हे आपण जाणून आहोत. त्यामुळे आपल्या संपूर्ण समाजव्यवस्थेचा प्राण म्हणजे फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा असल्याचे प्रतिपादन त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. अध्यक्षीय भाषणानंतर प्रसिद्ध अभिनेत्री प्रतिभा आहेर यांनी एकपात्री प्रयोग माता रमाई सादर करून रमाईच्या त्याग व बलिदानाची जाणीव करून रसिक, श्रोतेही क्षणभर भारावून गेले होते. या प्रसंगी मंचावर डॉ. राहुल म्हस्के, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे, बापुसाहेब सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्र-संचालन प्रसिद्ध सिने अभिनेते डॉ. दिलीप वाघ तर आभार डॉ. शंकर वाघमारे यांनी मानले. यावेळी डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. भगवान कांबळे, प्राचार्य डॉ. हसन इनामदार, अश्रुबा जाधव, माधव गाडेकर, प्रा. उत्तरांगिनी मांदळे, सह आयोजक बापु सोनवणे, नविन सिंग, सचिव, प्रा. वर्षा गायगोले, संजिवन सोनटक्के सह या संमेलनासाठी खास भारतातून निमंत्रित सर्वच रसिक, श्रोते मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंकी जि. प. शाळेत आनंद नगरी उपक्रम संपन्न



**कन्नड (अरुण थोरात):** कळंकी ता.कन्नड येथील जि.प.प्राथमिक शाळेत 'आनंद नगरी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मुलां मध्ये व्यवसाय कौशल्ये विकसित करुण कृषीमाल विपणन चे तंत्र विकसित करणे. तसेच आनंददायी शिक्षण मिळवून देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमोद थोरात यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ सह रानमेव्याचे स्टाल लावलेत, यास ग्रामस्थांनी प्रतिसाद देत खाद्यपदार्थ, रानमेव्याचा आस्वाद घेतला. यासाठी शालेय समिती अध्यक्ष प्रमोद थोरात, मुख्याध्यापक आर. जी. राठोड, श्रीमती बी. एम. बागुल, जे. एस. सोनवणे, डी. जी. गुडलावार, बी. ए. चोपणे, व्ही. बी. ठाकरे यांनी व्यवस्थापन केले. याप्रसंगी दिनकर दाभाडे, रावजी पथवे, रामेश्वर थोरात, हरिश थोरात, रमेश थोरात, अरुण थोरात, गोकुल थोरात, जयराम पथवे, रतन मधे, गणेश कदम, समाधान थोरात, समाधान पडवळ, बाळासाहेब थोरात, सजन आगळे, संदीप थोरात, संदीप पडवळ आदी उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ जानेवारी २०२५


## बळीराजा मराठवाडा शेतकरी संघटनेकडून बेमुदत साखळी उपोषण...



शेतकरी संघटनेच्या वतीने साखळी उपोषण करत असलेले कार्यकर्ते व पदाधिकारी.

मुरुम, ता. उमरगा, ता. ८ **(सुधीर पंचगल्ले)** : कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर बळीराजा मराठवाडा शेतकरी संघटनेकडून कृषी उत्पन्न बाजार समितीकडून पणन विभागाच्या आदेशाची पायमल्ली करण्यात आल्याबाबत तसेच विविध मागण्यांसाठी बेमुदत साखळी उपोषण करण्यात आले आहे.बाजार समितीमध्ये केलेल्या भ्रष्ट कारभाराबाबत सभापती व संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करून समिती बरखास्त करण्यात यावी. याकरिता पणन विभागाच्या वरिष्ठ कार्यालयास सातत्याने पाठपुरावा केला अनेक स्मरण पत्रे दिली. त्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधकांनी बाजार समितीला दिलेल्या ठराविक वेळेच्या आत अंमलबजावणी करुन अहवाल सादर करावा, असे आदेशान्वित केलेले असतानाही बाजार समितीने दखल न घेता या आदेशाला केराची टोपली दाखवली. त्या अनुषंगाने पणन विभागाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासह विविध मागण्यांसाठी २ जानेवारीपासून बाजार समितीच्या आवारात बेमुदत साखळी उपोषणास बळीराजा शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सुरुवात केली आहे. यामध्ये संघटनेच्या वतीने २५ जानेवारी २०२४ च्या आदेशातील प्रकारच्या रकमेबाबतचा निर्णय खारीज करणारे प्रभारी जिल्हा उपनिबंधक बी. व्ही. काळे यांची वरिष्ठ कार्यालयाच्या अधिनस्त चौकशी समिती नेमून खातेनिहाय चौकशी करण्याची शिफारस करुन सदर आदेशातील प्रकारच्या रकमेबाबतचा निर्णय पूर्ववत कायम करावा. सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये दुकानदारांनी खरेदी केलेल्या मालाच्या पावत्या, रजिस्टर नोंदी व विक्री केलेल्या शेतकऱ्यांची नामनिर्देशन यादी बाजार समितीच्या दर्शनी भागावर डकवावी. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करता मनमानी कारभार करणारी बाजार समिती बरखास्त करावी. मागास प्रवर्गातील नागसेन हणमंतराव बनसोडे, रा. मुरुम यांना नियमित भाडेतत्त्वावर विना डिपॉझिट गाळा उपलब्ध करून द्यावा. शेतकरी समितीच्या कार्यालयाकरिता विनाअट गाळा उपलब्ध करून मिळावा. गाळा वाटपाबाबत केलेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी चालू उपोषण स्थळी सर्वांसमोर लाईव्ह करण्यात यावी. आडत तीन टक्क्यांवरुन दोन टक्क्यांवर पूर्ववत करून शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करावा. तसेच कडता, मात्रा, सूट इत्यादी सवलतीच्या नावाखालील शेतमालाची केलेली भरमसाठ लूट थांबवावी आणि सॅम्पल करिता नेलेला माल परत आणून जमा करावा. शेतकरी पट्टीच्या मागे अनाधिकृत पाकिटनिहाय १५ रुपये हमाली लावण्यात येते ती बंद करावी, आदी मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

यावेळी परिसरातील अनेक मान्यवर व शेतकरी वर्गातील मंडळींनी उपोषण स्थळी भेट देऊन आंदोलनकर्ते सचिव उमाकांत मंगरूळे, अध्यक्ष आत्माराम वाघ, नागसेन बनसोडे, रजनीकांत वाघ यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला आहे.

## पत्रकारांच्या निर्भीड कार्याची कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक - सुनिल राठोड




मुरूम, ता. उमरगा येथे महात्मा बसवेश्वर पतसंस्थेच्या सभागृहात रोटरी क्लब मुरूम सिटी च्या वतीने आयोजित पत्रकारांच्या सत्काराप्रसंगी जांभेकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना मान्यवर व अन्य.

**मुरुम, ता. उमरगा, (सुधीर पंचगल्ले)** पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, ज्यामुळे समाजात सत्य, पारदर्शकता आणि जबाबदारी यांची रुजवण होते. सर्व पत्रकार धाडस आणि जिद्द ठेवून प्रत्येक परिस्थितीत सत्याचा पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्नशील असतात ते खरोखरच कौतुकास्पद आहे. या सत्कार समारंभाचा उद्देश तुमच्या या अमूल्य कार्याला दाद देण्याचा आहे. प्रामाणिक पत्रकारितेचा हा प्रवास असाच चालू राहो, असे मनोगत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा रोटरी क्लबचे सचिव सुनील राठोड यांनी व्यक्त केले. मुरूम शहरातील महात्मा बसवेश्वर पतसंस्थेच्या सभागृहात मंगळवारी (ता. ७) रोजी रोटरी क्लब मुरुम सिटीच्या वतीने पत्रकार दिनाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे सचिव सुनील राठोड होते. यावेळी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष कवी शिवशरण वरनाळे, मुरूम पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. डॉ. अप्पासाहेब सूर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर व समतानायक महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना राठोड म्हणाले की, पत्रकारांच्या अमूल्य योगदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. पत्रकारांच्या सत्काराचा उद्देश फक्त त्यांचे कौतुक करणे नाही, तर त्यांना प्रोत्साहन देणे आहे.

यावेळी कवी शिवशरण वरनाळे, डॉ. रामलिंग पुराणे, प्रा. डॉ. महेश मोटे, रफिक पटेल, बालाजी व्हनाजे आदींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. नितीन डागा, प्रकाश रोडगे, शिवकुमार स्वामी, डॉ. सुनील टिकांबरे, विजयकुमार कलशेट्टी, भूषण पाताळे, बाबासाहेब पाटील, मल्लिकार्जुन बदोले आदींनी परिश्रम घेतले. शहर व परिसरातील पत्रकार राजेंद्र घोडके, राजेंद्र कारभारी, रफिक पटेल, प्रा. डॉ. महेश मोटे, रवी अंबुसे, मोहन जाधव, बालाजी व्हनाजे, नहीरपाशा मासुलदार, हुसेन नुरसे, अजिंक्य मुरूमकर, इमरान सय्यद, अमोल कटके सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य कल्लया स्वामी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार राजेंद्र वाकडे यांनी मानले.

## वाचन म्हणजे डोळे, मन आणि बुद्धी यांचा व्यायाम - डॉ. प्रकाश खेत्री यांचे प्रतिपादन



**कन्नड :** महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड आयोजित "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत आज दि. ८ जानेवारी, २०२५ रोजी "वाचन कौशल्य कार्यशाळेचे " आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. प्रकाश खेत्री यांनी, आजच्या युगात माणूस यंत्र - तंत्रशरण बनत आहे, डोळ्यांचे आजार वाढत आहेत, मन आणि मेंदू भरकटत आहे. तेव्हा आपण वाचन हेतूपूर्वक केले पाहिजे, कारण वाचनातून विचारांचा जन्म होतो, विचारातून कृती जन्माला येते,कृतीतून सवय लागते. सवय जगण्याचा भाग बनते तेव्हा संस्कृती अस्तित्वात येते. तेव्हा भारताला सुसंस्कृत आणि समृद्ध करायचे असेल तर वाचनाचे कौशल्य आणि कला विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी. शरीराला जशी अन्नाची गरज आहे, तशीच गरज बुद्धीला वाचनाची आहे. व्यायामाने शरीर सशक्त बनते तर वाचनाने डोळे, मन आणि मेंदू समृद्ध होतो. तो व्यायामाच आहे.कोणताही समाज फॉरवर्ड होण्यासाठी बुक वर्ड होणे महत्त्वाचे आहे.असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रणजीत पवार होते, या प्रसंगी डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. प्रकाश महाजन, कार्यक्रमाचे संयोजक ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख व श्री. संजय निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ जानेवारी २०२५


## सात दिवसीय रासेयो विशेष शिबिराची उत्साहात सांगता




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाचे 'राष्ट्रीय सेवा योजनेचे' सात दिवसीय विशेष शिबिर दिनांक ३१/१२/ २०२४ ते दिनांक ०६/०१ /२०२५ या कालावधीत रहाळपट्टी तांडा, जटवाडा रोड येथे आयोजित केले गेले. आज दिनांक ०६/ ०१/ २०२५ रोजी या विशेष शिबिराचा समारोप समारंभ पार पडला. या समारोप समारंभाला अध्यक्ष म्हणून मराठवाडा लिगल अँण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीचे सचिव अॅडव्होकेट श्री. डी. एस. कुलकर्णी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल तसेच डॉ. प्रतिभा धोंडकर, डॉ. प्रभाकर गायकवाड, डॉ. शिवाजी वाघमारे, प्रा. शरद देशमुख, रहाळपट्टी तांड्याचे ग्राम सदस्य श्री. नंदू भाऊ चव्हाण, श्री. लहानु काका चव्हाण याप्रसंगी उपस्थित होते. रासेयो गीत गाऊन समारोप समारंभाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. मान्यवरांनी सरस्वती पूजन केले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अन्विता अग्रवाल यांनी या सात दिवसीय विशेष शिबिराचे अहवाल वाचन करून या सात दिवसांमध्ये घेतलेल्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला. या सात दिवसांच्या शिबिरात प्रामुख्याने बालविवाह निर्मूलन, स्वच्छतेचे महत्त्व, व्यक्तिमत्व विकास, तंत्रज्ञान आणि आर्थिक सुरक्षा, युवकांचे मानसिक स्वास्थ्य आणि तंत्रज्ञान, आहार व युवा वर्ग, यासारख्या ज्वलंत विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. तसेच प्रतिदिन प्रातःकाली या विषयांवर प्रभात फेरीचे आयोजन करण्यात येऊन ग्रामस्थांना संध्याकाळच्या सत्रात पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. कु.साफल्या धानोरकर व कु.उज्वला चव्हाण या स्वयंसेविकांनी शिबिरात घेतलेले अनुभव आपल्या मनोगताद्वारे व्यक्त केले. यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी उपस्थित स्वयंसेविकांना मार्गदर्शन केले.

रासेयो हा वैविध्यपूर्ण ज्ञान संपादित करण्याचा मार्ग आहे, व्यक्तिमत्व विकासाचे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे त्याचा प्रत्येकाने नक्कीच उपयोग केला पाहिजे. या शिबिरात केलेल्या प्रत्येक कामाचा तसेच आयोजित प्रत्येक व्याख्यानाचा स्वयंसेविकांना जीवनात नक्कीच उपयोग होईल असे याप्रसंगी प्राचार्यांनी सांगितले. यानंतर आजच्या समारोप समारंभाला अध्यक्ष म्हणून लाभलेले अॅडव्होकेट श्री. डी. एस. कुलकर्णी यांनी रासेयो समितीच्या कार्याबाबत व जबाबदारीबाबत स्तुत्य असे वक्तव्य केले. याप्रसंगी बोलताना सरांनी स्वयंसेविकांना भावी आयुष्यासाठी रासेयो ही एक संधी आहे या संधीचा उपयोग करा आणि इतरांनाही याचा उपयोग करून द्या, महाविद्यालयीन जीवन हे पुन्हा येत नाही म्हणून या वेळेत, या क्षणी जितक्या गोष्टी तुम्हाला शिकता येतील त्या शिका आणि त्याचा फायदा घ्या, त्याचा उपयोग करा असे महत्त्वपूर्ण व उद्बोधन पर मार्गदर्शन सरांनी यावेळी केले.

डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी स्वयंसेवकांना सांगितले की, दरवर्षी आम्ही अशा उपक्रमांचे आयोजन करू आणि तुम्हा सर्वांचा सहभाग हा या शिबिराच्या अवर्णनीय ऊर्जेचा स्त्रोत आहे. यानंतर 'झाडे लावा, झाडे जगवा' या विषयावर मान्यवरांसमोर पथनाट्य सादर करण्यात आले व या पथनाट्यातून उज्वल भविष्यासाठी झाडांचे महत्त्व किती आहे हे ग्रामस्थांना पटवून दिले. तसेच प्रत्येकाने एक तरी झाड लावावे जेणेकरून प्रत्येकाला ऑक्सिजनचा पुरवठा योग्य प्रमाणात होईल असा महत्वपूर्ण संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचा शेवटचा टप्पा म्हणजे आभार प्रगटन. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरवार यांनी आभार प्रगटन केले. हे सात दिवसीय शिबिर यशस्वी करण्यासाठी लाभलेल्या सर्वच सहकाऱ्यांचे, ग्रामस्थांचे तसेच प्राध्यापकांचे त्यांनी आभार मानले. शिबिराच्या समारोप समारंभाचा शेवट हा राष्ट्रगीताने झाला.

## जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत जि. प. रेल संघाचे वर्चस्व



**कन्नड (अरुण थोरात) :** मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद विकास मीना यांच्या संकल्पनेतून आयोजित जिल्हास्तरीय पालक व विद्यार्थी यांच्या क्रीडा स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या स्पर्धेत जिल्हातील ९ संघांनी सहभाग घेतला होता. व्हॉलीबॉल स्पर्धेत कन्नड मुलींच्या संघानी पैठण व अंतिम सामन्यात वैजापूर संघाला (१५-५/१५-२) सरळ दोन सेट मध्ये पराभूत करून प्रथम क्रमांक पटकावला व मुलांनी तृतीय क्रमांक पटकावला. या संघाना मुखायधपक व तालुका व्हॉलिबॉल क्रीडा मार्गदर्शक प्रवीण शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाचे गटशिक्षण अधिकारी श्रीमती.श्री श्रीमाळ, विस्तार अधिकारी डी डी शिंदे, केंद्रप्रमुख बाजीराव ताठे, प्रशालेचे मुखयाध्यापक दिलीप गायकवाड, योगेश मुळे, दिलीप मगर, वनारसे, वैष्णव, वैशाली बोर्से, विक्रम गदळे, दिलीप मगर, छाया बोडखे, आदींनी अभिनंदन केले, तर पंच म्हणून एजाज शहा, विशाल दांडेकर, आली बकोदा यांनी काम पाहिले. विजयी संघ पुढीलप्रमाणे:- मुली. श्वेता दिवेकर, ऋतुजा जाधव, शालिनी बोडखे, प्रणाली थेटे, वैष्णवी थेटे, अक्षरा बोडखे, गौरी जठार, फातिमा शेख, कावेरी नागे मुले. नयन बोडखे, ओम थेटे, हे सुशांत थेटे, लखन थेटे, चेतन नागे, प्रणल राठोड, प्रणव राठोड, अजिंक्य गायकवाड.

## उबाठा चे नगरपरिषदे समोर ढोल बजाव आंदोलन संपन्न




**कन्नड (अरुण थोरात):** उबाठा पक्षा च्या वतीने दि.०८ जानेवारी रोजी कन्नड नगर परिषद कार्यालया समोर ढोल बजाओ आंदोलन करुण प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने कन्नड शहरातील स्वच्छता, पाणी प्रश्न, पथदिवे, मोकाट जनावर व नागरी सुविधा यासाठी दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी तहसीलदार यांना निवेदन दिले होते. त्याच्या वर कारवाई न झाल्यामुळे झोपी गेलेल्या नगरपालिकेला जागी करण्यासाठी पक्षाच्या वतीने ढोल बजाव आंदोलन करण्यात आले. सकाळी ११ वाजता कन्नड नगर परिषदे समोर व जुन्या तहसील समोर ढोल वाजून हा परिसर अक्षरशः दणदणून सोडला. रोडवर येणाऱ्या जाणाऱ्यांची मोठी गर्दी झाली. बऱ्याच वेळ ढोल वाजत असल्यामुळे नगरपालिकेतील कर्मचारी गेटवर येऊन मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांच्या सूचने नुसार कार्यालयीन अधिकारी प्रशांत देशपांडे यांनी लेखी स्वरूपात पुढील काम करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी शिवसेना शहर प्रमुख तथा माजी उपनगराध्यक्ष डॉ सदाशिव पाटील, उपतालुकाप्रमुख शिवाजी थेटे, सामाजिक कार्यकर्ते डॉ खालील पटेल, उपशहर प्रमुख चंद्रकांत लाडे, सलमान शेख, प्रकाश काचोळे, विभाग प्रमुख उदय सोनवणे, उपविभाग प्रमुख राजीव पवार, सामाजिक कार्यकर्ते गोकुळ राठोड, शेख अमुभाई, संतोष बनकर, पंकज चव्हाण, राज ठाकूर, सचिन गिरे, विकास खाजेकर, भोला पवार, दिनेशसेठ अग्रवाल, विशाल शिंदे, अर्जुन मटकर, संदीप गुट्टुरसिंग, दीपक वाघ, नगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा निरीक्षक देविदास पाटील, फसवद्दीन शेख वसुली विभाग, विद्युत अभियंता राहुल करडे, आरोग्य निरीक्षक पवन परदेशी, सिद्धार्थ बनकर आदी नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ जानेवारी २०२५

# थायलंडमध्ये सुरू असलेल्या पहिल्या फुले शाहू आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनातील काही क्षणाचित्रे













